




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २३३ • शनिवार दि.१३ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## हवाई दलाचे विमान कोसळले; ५ जवानांचा मृत्यू

### सह-वैमानिक बचावला



नवी दिल्ली: जोरहाट येथे भारतीय हवाई दलाचे मालवाहू विमान लँडिंगदरम्यान कोसळून भीषण दुर्घटना घडली. या अपघातात भारतीय हवाई दलातील पाच जवानांचा मृत्यू झाला असून सह-वैमानिक गंभीर जखमी अवस्थेत बचावला आहे. त्याच्यावर सध्या उपचार सुरू असून अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी हवाई दलाने चौकशीचे आदेश दिले आहेत.

आसाममधील जोरहाट जिल्ह्यातील 'रोरिया' परिसरात आज शनिवार दि.१३ जून रोजी हवाई दलाच्या तळावर ४३ व्या स्क्वॉड्रनचे एएन-३२ हे मालवाहू विमान उतरत असताना हा अपघात झाला. विमानात लष्करी साहित्य आणि अन्य मालवाहतूक सामग्री होती. विमान धावपट्टीवर उतरत असतानाच नियंत्रण सुटल्याने ते कोसळले. अपघातानंतर विमानाचे दोन तुकडे झाले आणि काही क्षणांतच त्याला भीषण आग लागली. या दुर्घटनेत स्क्वॉड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीरवायू दानिश आलम यांचा मृत्यू झाला. सह-वैमानिकाला वेळीच बाहेर काढण्यात यश आले असून त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. भारतीय हवाई दलाने या दुर्घटनेची अधिकृत पुष्टी करत घटनास्थळावरील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगितले आहे. अपघाताचे नेमके कारण समोर आले नसले तरी त्यासाठी चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून तांत्रिक बिघाडासह सर्व शक्यतांचा तपास केला जाणार आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे विमान अरुणाचल प्रदेशातून जोरहाटकडे येत होते. सोव्हिएत बनावटीचे एएन-३२ हे दोन इंजिन असलेले टॅक्टिकल ट्रान्सपोर्ट विमान असून ईशान्य भारतातील दुर्गम आणि उंचावरील भागांमध्ये लष्करी रसद पोहोचविण्यासाठी ते अनेक दशकांपासून वापरले जात आहे. मात्र, यापूर्वीही या विमानांशी संबंधित गंभीर दुर्घटना घडल्या आहेत. जून २०१९ मध्ये जोरहाट हवाई तळावरून अरुणाचल प्रदेशातील पान ४ वर

## शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी टाळावी-हवामान तज्ज्ञांचा सल्ला

### पावसात खंड पडण्याची शक्यता

पुणे:राज्यातील काही भागांत पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली असली, तरी त्यावर विसंबून शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये, असा महत्त्वपूर्ण सल्ला हवामान तज्ज्ञांनी दिला आहे.

यंदा मान्सूनच्या वाटचालीवर 'एल निनो'चा प्रभाव स्पष्टपणे जाणवत असून पावसामध्ये खंड पडण्याची शक्यता लक्षात घेता पेरणीचे निर्णय अत्यंत सावधगिरीने घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे वेधशाळेचे हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी आवश्यक वातावरणीय परिस्थिती अनुकूल नसल्याने त्याचा वेग मंदावला आहे. त्यामुळे पुढील काही



दिवस राज्यभर व्यापक स्वरूपाच्या पावसाची शक्यता कमी असून, पूर्वमोसमी पावसाच्या आधारे पेरणी करण्याचा निर्णय शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.तज्ज्ञांच्या मते, पेरणीनंतर पावसात दीर्घ खंड पडल्यास पिकांच्या उगवणीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होऊ शकते. विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या भागांतील शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या अंदाजाचा नियमित आढावा घेऊनच पेरणीचे नियोजन करावे, असा सल्ला देण्यात आला आहे.यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत पावसाच्या आगमनात विलंब होण्याबरोबरच पर्जन्यमानाच्या वितरणातही असमतोल निर्माण होण्याची शक्यता आहे. काही भागांत पावसाचा दीर्घ खंड, तर काही ठिकाणी अल्प कालावधीत अतिवृष्टी होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला पान ४ वर

## सरसकट कर्जमाफीसाठी रोहित पवारांचा अन्नत्याग

### शेतकरी संघटनांचा पाठिंबा;पडळकर,खोत आणि हाके यांची बोचरी टीका

सांगली:शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ.रोहित पवार यांनी पंढरपुरात शुक्रवारपासून सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. शेतकरी संघटनांकडून आंदोलनाला पाठिंबा मिळत असताना महायुतीतील नेत्यांनी मात्र या आंदोलनावर टीकेची झोड उठविली आहे.



नुकतेच राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी पासून अनेक शेतकरी वंचित राहणार असल्याने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करावी या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आ.रोहित पवार कालपासून उपोषणास बसले आहेत. या उपोषणाला राज्यातील अनेक शेतकरी संघटनांनी पाठिंबा दर्शविला आहे. मात्र सत्ताधारी महायुतीतील घटक पक्षांकडून टीकेची झोड उठविण्यात आली आहे. या संदर्भात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रोहित पवार यांचे आंदोलन ही नौटंकी असल्याची टीका केल्यानंतर भाजपचे नेते गोपीचंद पडळकर यांनीही आंदोलनावर निशाणा साधला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना साखर कारखान-दारांकडून संपूर्ण एफआरपी मिळेपर्यंत रोहित पवार यांनी उपोषण सुरू पान ४ वर

## भूमी अभिलेख कार्यालयाची इमारत रातोरात जमीनदोस्त

### किनवटमध्ये शासकीय मालमत्तेवर डल्ला?;प्रशासनाच्या भूमिकेवर संशय

किनवट/प्रतिनिधी-किनवट शहरातील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयाची इमारत रातोरात भूईसपाट करण्यात आलीय. भूमी अभिलेख विभागाच्या मालकीची इमारत पाडल्यानंतरही भूमी अभिलेख विभागाच्या किनवट प्रशासनाने अद्यापही पोलीसात तक्रार दिलेली नाही. प्रशासनाच्या दिरंगाई आणि अनास्थेमुळे शासकीय मालमत्ता सुरक्षित राहिलेल्या नाहीत. ही इमारत उद्ध्वस्त करून इमारत पुरावा नष्ट करणाऱ्या अज्ञाताविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात



यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. इमारत भूईसपाट करुन गजासह लोखंडी साहित्य लांबवण्यामागे कोणाचा हात आणि जेसीबी कोणाची याचा छडा पोलीस तपासातून लागू शकते.

सत्तावीस वर्षांपूर्वी पासूनचा या भूमी अभिलेख कार्यालय इमारतीचा इतिहास होता. शहराच्या बाहेर ही इमारत असल्याने भूमी अभिलेख कार्यालय फार काळ त्या इमारतीत राहू शकले नाही, कारणही तसेच होते. सदोष बांधकाम असल्यामुळे अल्पावधीतच इमारत धोकादायक झाली आणि कार्यालयाने तेथून गाशा गुंडाळला. बरेच वर्ष भांड्याच्या इमारतीत होते. अलीकडे मात्र तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील एका इमारतीत भूमी अभिलेख कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात भूमी अभिलेख विभागाचे त्या इमारतीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले हे विशेष. भूमी अभिलेख कार्यालयासाठी १९९७ मध्ये ५ गुंठे भूखंड ७५ लाख रुपयाच्या आसपास प्रशासनाने खरेदी केला. १९९९ मध्ये इमारतीचे बांधकाम केल्याचे सूत्रांकरवी ऐकायला मिळते. भूमी अभिलेख विभागाचे उपाधीक्षक महेंद्र गंभीरे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ पोलीसात तक्रार द्यायला पाहिजे होती. ८ जूनच्या पावसानंतर इमारत भूईसपाट केली असावी असा अनेकांचा अनुमान ऐकायला मिळतोय. जवळपास पाच दिवस ओलांडल्या नंतर सुद्धा प्रशासनाने पोलीसात तक्रार दिलेली नाही. याबद्दल तर्कवितर्कांने जोर धरलाय.

## एमपीडीए अंतर्गत सराईत गुन्हेगार स्थानबद्ध

नांदेड/प्रतिनिधी-एमपीडीए अंतर्गत सराईत गुन्हेगार शेख शमी उर्फ अरबाज शेख रऊफ यास स्थानबद्ध करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

नांदेड जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळी विरुद्ध कडक कारवाई सुरु केली आहे. एमपीडीए व मोका अंतर्गत अनेक गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले. तसेच काही गुन्हेगारांवर हद्दपारीची कार्यवाही करण्यात आली आहे. चालू वर्षात पोलीस प्रशासनाने जिल्ह्यातील तेरा गुन्हेगाराला एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार शेख शमी उर्फ अरबाज पिता शेख रऊफ (वय २४), रा.मदनी कॉलनी, देगलूरनाका,नांदेड याच्या विरुध्द विविध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक कार्यवाही करुनही शेख शमी उर्फ अरबाज याच्या वर्तवणुकीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शेख शमी उर्फ अरबाज याच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी तयार करुन मंजुरीसाठी पाठविला होता. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दि.१३ जून रोजी मंजुरी देवून स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. पोलीसांनी तात्काळ शेख शमी उर्फ अरबाज यास तात्काळ ताब्यात घेवून त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली.

## गुत्तेदाराची मुजोरी;मनपा अधिकाऱ्यांची डोळेझाक

### अमृत-२ योजनेतील पाईपलाईनचे काम दर्जाहिन

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम आणि सुरळीत करण्यासाठी केंद्र शासनाच्या अमृत-२ योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना प्रत्यक्षात सुरू असलेल्या पाईपलाईन कामांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ठेकेदार आणि सबगुत्तेदारांच्या मनमानीला महापालिकेच्या अधिकाऱ्यांची मूक संमती मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, त्यामुळे गुत्तेदाराची मुजोरी; अधिकाऱ्यांची डोळेझाक असे चित्र शहरात



पाहायला मिळत आहे.

शहरातील विविध भागांमध्ये नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र अनेक ठिकाणी पाईपलाईन एकसमान पातळीवर न टाकता खाली-वर टाकण्यात आल्याचे दिसून येत आहे. तांत्रिक निकषांकडे दुर्लक्ष करून सुरू असलेल्या या कामामुळे भविष्यात पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कामादरम्यान जेसीबी आणि इतर यंत्रसामग्रीच्या वापरामुळे नागरिकांच्या जुन्या नळजोडण्या, ड्रेनेज लाईन तसेच इतर भूमिगत सुविधा मोठ्या प्रमाणावर नुकसानग्रस्त झाल्या आहेत. विशेष म्हणजे, करारानुसार अशा नुकसानीची दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर असतानाही अनेक ठिकाणी नागरिकांकडून साहित्य व दुरुस्तीचा खर्च वसूल केला जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. काही ठिकाणी तर तुम्हाला जे करायचे ते करा अशा उद्दाम पान ४ वर




# दोषींवर कारवाई कधी?

**देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाने शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा उघड केल्या आहेत. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून दोन-दोन वर्षे अथक परिश्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना या गैरप्रकारांची मोठी किंमत मोजावी लागत आहे. यंदा मार्चमध्ये झालेल्या वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षेतील पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द करण्याची वेळ आली. त्यानंतर केंद्र सरकारने २१ जून रोजी परीक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या सर्व घडामोडींमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे, खरे दोषी नेमके कधी आणि कसे शिक्षा भोगणार? वैद्यकीय प्रवेश परीक्षेची जबाबदारी अनेक वर्षांपासून नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) या संस्थेकडे आहे. यापूर्वीही विविध परीक्षांमध्ये पेपरफुटी, गैरव्यवहार आणि व्यवस्थापनातील त्रुटींचे प्रकार समोर आले होते. मात्र त्या प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती ठोस कारवाई झाली, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर आलेली नाही. त्यामुळे यंत्रणेमधील जबाबदारी निश्चित करण्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होतात.यंदाच्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने मोठ्या प्रमाणावर तपास सुरू केला आहे. कोचिंग क्लासेसशी संबंधित व्यक्ती, पेपर सेट करणारे, सेटर, मॉडरेटर आणि दलाल अशा अनेकांना अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला त्यांना सीबीआय कोठडी देण्यात आली आणि सध्या न्यायालयीन कोठडीत त्यांच्यावर चौकशी सुरू आहे. या कारवाईमुळे तपास यंत्रणा सक्रिय असल्याचे चित्र दिसते. परंतु या संपूर्ण प्रक्रियेत एनटीएमधील संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी काय?, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.प्राप्त माहितीनुसार काही अधिकाऱ्यांच्या केवळ बदल्या करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र इतक्या मोठ्या गैरप्रकारानंतर केवळ बदली ही पुरेशी शिक्षा ठरू शकत नाही. पेपरफुटी सारखी घटना घडण्यासाठी केवळ बाह्य घटक जबाबदार असतात, असे मानणे भोळेपणाचे ठरेल. परीक्षा प्रक्रियेत सुरक्षा, गोपनीयता आणि नियंत्रण यांची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिकाही तपासली जाणे आवश्यक आहे. अन्यथा खालच्या स्तरावरील काही लोकांना शिक्षा होईल आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेले अधिकारी मात्र मोकळे राहतील, अशी भावना जनमानसात निर्माण होणे स्वाभाविक आहे.सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सरकारने पुढील परीक्षा प्रक्रियेवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर एनटीएने २१ जून रोजी होणाऱ्या परीक्षेसाठी काही सुधारणा जाहीर केल्या आहेत. विद्यार्थ्यांना १५ मिनिटांचा वाढीव वेळ, प्रशासकीय प्रक्रियेसाठी स्वतंत्र वेळ, प्रश्न पत्रिका समजून घेण्यासाठी अतिरिक्त सुविधा तसेच रफवर्कसाठी अधिक जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुधारणा निश्चितच स्वागतार्ह आहेत. परीक्षा प्रक्रियेला अधिक पारदर्शक आणि विद्यार्थी केंद्रित बनविण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र सुधारणा आणि सुविधा यापलीकडे जाऊन उत्तरदायित्व निश्चित करणे अधिक महत्त्वाचे आहे. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात घालणाऱ्या गैरप्रकारांची पुनरावृत्ती टाळायची असेल तर दोषींना कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. केवळ दलाल, मध्यस्थ किंवा कोचिंग क्लासेसशी संबंधित व्यक्तींवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. यंत्रणेतील त्रुटी, निष्काळजीपणा किंवा संगनमत यांचाही शोध घेणे गरजेचे आहे. आज विद्यार्थी आणि पालकांचा संताप केवळ परीक्षा रद्द झाल्यामुळे नाही; तर वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्यामुळे आहे. विद्यार्थ्यांनी केलेली मेहनत, त्यांचे मानसिक ताणतणाव आणि पालकांनी केलेला आर्थिक त्याग यांची किंमत कोण मोजणार?, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. देशातील सर्वोच्च व्यावसायिक शिक्षण प्रवेश प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवायची असेल तर या प्रकरणाचा तपास शेवटपर्यंत पोहोचला पाहिजे. दोषी कोणताही असो; दलाल, कोचिंग चालक, पेपर सेटर किंवा संबंधित अधिकारी त्याच्यावर समान आणि कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा प्रत्येक पेपरफुटीनंतर नवे आश्वासन, नवी सुधारणा आणि नवा तपास याच चक्रात विद्यार्थी भरडले जातील. त्यामुळे आज सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झालेला प्रश्न रास्त आहे; अटक झालेल्या आरोपींवर कारवाई सुरू आहे, पण यंत्रणेतील खऱ्या दोषींना नीट कधी केले जाणार?**

# सायबर गुन्हेगारी; सावध होण्याची गरज




अंकुश शिंगाडे
नागपूर

कालची चोर मंडळीही आज हुशार झालेली असून तेही आज ऑनलाईन स्रोताची पद्धत गुन्हेगारीसाठी वापरु लागलेली आहेत. ज्यातून आपलं बँकेचं अकाऊंट सुद्धा खाली होतं. अशी आज वेळ आलेली आहे. त्यामुळं अलिकडील काळ हा ऑनलाईन स्रोताचा काळ जरी असला तरी या काळात माणसाला अतिशय सावधगिरीनं वागावं लागतं. नाही वागल्यास आपलीच फसगत होते, असे म्हटल्यास हरकत नाही. आजचे भिक्षा मागणारेही एवढे हुशार झाले आहेत की ते आपण दिलेला एक रुपया वा दोन रुपये घेत नाहीत. फेकून देतात. याचा अनुभव आपल्याला पदोपदी येतोच. आजची भिक्षा मागणारी मंडळीही अतिशय श्रीमंत असून ते मोबाईल माध्यमाचा वापर करु शकतील. एवढं आजचं तंत्रज्ञान विकसीत झालेलं आहे. आजच्या काळात चोरांजवळ व भिकारी वर्गांजवळ एवढा पैसा आहे की ऐषआरामानं जगतात नव्हे तर भिक्षा मागण्यासाठी आपलेच हातपाय कापतात. आपला चेहरा व शरीर विद्रूप करतात आणि आपण मात्र भरपूर पैसा असूनही केवळ हलाखीचे जीवन काढत असतो. ही आपली अवस्था आहे आज. ही शोकांतिकाच आपली. कारण अलिकडील काळात परीवर्तन झालं. नवनवीन शोध लागले व सारंच बदललं. त्यामुळं आजचे भिक्षा मागणारे लोकँही बदलले व चोरही तेवढेच बदलले. ज्यातून सायबर गुन्हेगारीचं प्रमाण वाढलं. मात्र कालचा काळ असा नव्हता.

भिक्षा मागणारी मंडळी ही काल विशिष्ट समाजाचीच असायची. त्यातही ते नियमांशी बांधील असायचे. फक्त ते पाचच घरी भिक्षा मागायचे. सहाव्या घरी नाही. ज्यात पाच घरातून एखाद्यावेळेस माधुकरी मिळाली नाही तर ते चक्कं उपाशी राहायचे. आज तसं नाही. आजचे भिकारी हे नियमाला धरुन चालत नाहीत. त्यांना नियमही माहीत नाही. ते पाचच घरं नाहीत तर एका दिवसाला कितीतरी घरात पैसे मागतात. एवढंच नाही तर ते ऑनलाईन स्रोताचा मार्ग अवलंबून सायबर गुन्हेगारी करीत असतात घरोघरी जावून. त्यातच आजचे चोरही तशाच पद्धतीनं वागतात.अलिकडील काळातच लागलेला स्मार्टफोनचा शोध. ज्या माध्यमातून आजच्या काळात असे चोर सुटलेले आहेत की जे चोर अतिशय शिताफीनं कोणाच्याही लक्षात न येवू देता आपले पैसे चोरत आहेत. यात अतिशय हुशारात हुशार असलेली मंडळीही लोभापायी अडकत आहे. अशावेळेस आपण हुशार नसलो तर नक्कीच आपली फसगत होते. यात भिकारी सुद्धा मागे नाहीत.ऑनलाईन स्रोताच्या माध्यमातून कशी व कोणत्या प्रकाराची फसगत होते? या बाबतीत विचार करायचा झाल्यास अनेक बाबतीत आपली फसगत होवू शकते.

१) पहिली फसगत ही आर्थिक बाबींवरुन होते. जसे आपल्या बँक खात्यात रक्कम असेल तर ऑनलाईन स्रोताच्या माध्यमातून आपल्याच बँकेतील आपलेच पैसे काढून घेतले जातात.२) दुसरी फसगत होते अत्याचाराची. बऱ्याचशा मुली या सोज्वळ स्वभावाच्या असतात. त्या कोणत्याही गोष्टी घरी सांगायला हिंमत करीत नाहीत. अशावेळेस ऑनलाईन स्रोताद्वारे काही लोकँ त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांची फसगत करीत असतात. ही फसगत केवळ तरुण मुलीतच होत नाही तर वयोवृद्ध माणसांचीही होवू शकते.३) तिसरी फसगत आपल्याला दूरसंचार नियामक मंडळांच्या नावाने कॉल येणे. याबाबतीत आपल्याला अचानक कॉल येतो. ट्रायचा अधिकारी असल्याचं सांगीतलं जातं. आटल्या मोबाईल क्रमांकाचा वापर हा बेकायदेशीर कृत्यासाठी झाल्याचे सांगण्यात येते. आपल्यावर दबाव टाकला जातो. आटली मोबाईल सेवा बंद होईल असे सांगण्यात येते.

४) चौथी फसगत म्हणजे कधीकधी आपण पोलीस असल्याचे सांगण्यात येते. आपला जवळचा नातेवाईक एखाद्या गुन्ह्याचा आरोपी असल्याचे सांगण्यात येते. त्यातच एखादा बोगस अधिकारी व्हिडीओ कॉलवर आपल्याला गुन्ह्याची माहिती देतो. कधीकधी हेच बोगस अधिकारी आपल्यालाही गुन्ह्यात अटक करण्याची धमकी देतात. आपली तपासणीही करतात. म्हणतात की आपण अनधिकृत वस्तू वापरलेली आहे. त्यातच आपल्याला डिजीटल स्वरुपात अटक करण्याची धमकी देतात. ५) कधीकधी ऑनलाईन स्रीचे कॉल येतात व ती आपल्याला कॉल करतांना त्याचं रेकॉर्डिंग करते. त्यानंतर ती आपल्याला ब्लॅकमेल करीत असते. याबाबतीत आणखी सांगायचं म्हणजे एक फेसबुकवर व्हिडीओ दिसतो. एका प्रतिष्ठित समाजसेवकाला एक महिला रस्त्यातून लिफ्ट मागते. त्यानंतर ती त्याचा मोबाईल क्रमांक मागते व त्यानंतर त्याचीच तक्रार पोलिसात नोंदवते. मग काय, त्याला ती आपल्या जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न करते. वेगवेगळी आरोप लावते.६) कधीकधी आपल्याला मोबाईलवर कॉल येतो व झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग सांगीतला जातो. शेअर बाजाराद्वारे काही प्रतिशत टक्केवारी देण्याची भाषा बोलली जाते. ज्यातून आपण त्यात लोभाद्वारे अडकतोच.

७) कधीकधी आपल्याला पार्सल पाठवलं जातं व ते सोडविण्यासाठी ओटीपी मागितला जातो. ओटीपी दिला की बस, आपल्या खात्यातील पैसे एका क्षणात गायब होतात. यात आणखी एक प्रकार म्हणजे आपल्याला एल आय सीचे पैसे मिळत असल्याचे सांगितले जाते. त्याचवेळेस ते पाठवा म्हटल्यावर पाठवल्याचा मेसेज टाकला जातो. त्यानंतर दहा मिनिटात कॉल येतो व सांगीतलं जातं की आपल्याला एल आय सी के पैसे पाठवले आहेत. परंतु दहा हजार जास्त गेले आहेत. ते परत पाठवा. कधी सरकारी योजना घेवून अधिकारी असल्याचं सांगून लोकँ येतात. त्यानंतर ओ टी पी मागतात व ओटीपी दिला की बस. नुकत्याच झालेल्या जनगणनेतही असेच व्हिडीओ प्रसारीत झाले. ज्यात आपण जनगणना अधिकारी असल्याचे सांगून ओटीपी मागून डिजीटल पैसे काढण्याचा व्हिडीओ होता. यावर घटना घडल्याही असतील. परंतु त्या उघडकीस आल्या नाहीत.८) कधीकधी आपण बँकेचे कर्मचारी असल्याचे सांगण्यात येते व कर्ज मंजूरी, लॉटरी लागणे, इत्यादी बाबी सांगून लुटलं जातं. यात कधी के वाय सीचा सापआही रचला जातो.९) कधीकधी सायबर गुन्हेगार आयकर परताव्याचा फोन करतो व पिन कोड नंबर मागून आपल्याला फसवत असतो.

१०) कधीकधी बँकेचे अधिकारी आहोत व आपण अमुक अमुक बँकेतून बोलत आहोत. असा फोन येतो व म्हटलं जातं की आमच्या बँकेतील रक्कम आपल्या खात्यावर गोळा झाली. ती द्या, नाहीतर आम्ही पोलीसात जावू. अशी धमकी देण्यात येते. ज्यातून आटण घाबरतो व फालतूची कटकट नको. म्हणून बँकेत डिजीटल माध्यमातून पैसे भरतो.११) कधीकधी आपल्या घरी भिक्षा मागायला भिकारी येतात. ज्यांची आपल्याला दया येते. ते आजुबाजूला आपली चौकशी करतात. मग आपल्या घरी येवून आपल्यालाच आपला परीचय देतात. त्यात भाळून आपल्याकडून आपलीच काही माहिती घेतात. ज्यातून ते सायबर फसवणूक करु शकतात आपली.सायबर गुन्हेगार हे अतिशय हुशार असतात. ते डिजीटल ए आय तंत्राचा वापर करुन आपल्याला बरेचदा आर्थिक गंडा घालत असतात. कधी लैंगिक शोषणही करीत असतात. कधी ब्लॅकमेलसारखा प्रकार करीत असतात. या गोष्टीपासून आपण सावध राहायला हवे. त्यात शक्यतोवर फसूच नये आणि नजर चुकीनं समजा फसलोच तर आपण घाबरुन जावू नये. मुख्यतः खालील गोष्टी कराव्यात.

१) सर्वात प्रथम आपल्याला जे सायबर गुन्हेगार फोनवर कॉल करुन घाबरवतात. अशावेळेस आपण घाबरुन जावू नये. लाजू नये की लोकँ काही म्हणतील. जसा एखादा वयोवृद्ध माणूस एखाद्या सुंदर स्रीशी प्रेमाच्या गोष्टी बोलत असेल व तिनं त्याची फसगत केली असेल तर त्यानं आपण म्हातारे आहोत. आपण ही गोष्ट कशी कोणाला सांगावी. लोकँ काय म्हणतील. याची लाज बाळगू नये. हिंमत व आत्मविश्वास ठेवावा आपल्या मनात. त्यातच संयम बाळगावा व ती गोष्ट इतरांना सांगावीच. जेणेकरुन त्यातून मार्ग निघू शकतो.२) दुसरी अतिशय महत्वाची गोष्ट म्हणगे आपल्याशी अशी बनवाबनवी घडल्यास वा आपली फसगत होत आहे असं लक्षात येताच ही गोष्ट सर्वात आधी शक्यतोवर लवकरात लवकर आपल्याच घरच्या लोकांना सांगावी. अन तशीही आपलि हिंमत होत नसेल तर तीच गोष्ट आपल्या जवळच्या अतिशय जीवलग असलेल्या मित्रांना सांगावी व त्यावर उपाय विचारावा. कोणी ना कोणी आपल्याला त्यावर उपाय सांगू शकतो.

३) तिसरा महत्वाचा उपाय म्हणजे पोलिसात जाणे. सायबर गुन्हेगारानं कितीही आपल्याला आपण पोलीस असल्याचे सांगीतले. आपण कितीही मोठ्या प्रमाणावर फ्रॉड केला असला वा नजरचुकीनं झाला असला तरी ती गोष्ट वा त्याबाबतीत तक्रार शक्य तेवढ्या लवकर पोलिसात नोंदवावी. जेणेकरुन त्याचा छडा लागू शकेल व दूध चं दूध व पाण्याचं पाणी तरी करता येईल. ४) कधीकधी आपल्या घरी येणाऱ्या अनोळखी माणसांवर विश्वास ठेवू नये. भिक्षा मागणाऱ्या लोकांना दारावर प्रवेश देवू नये. जास्त लाडीगोडी लावू नये. याही पुढे जावून दारावर वस्तू विकायला येणाऱ्या व्यक्तींकडून वस्तू घेवून ऑनलाईन पेमेंट करौ नये. ज्यातून आपली फसगत होणार नाही. हे लक्षात घ्यावे. त्यांना आपली कोणतीच माहिती शेअर करु नये.

महत्वाचं सांगायचं झाल्यास सायबर गुन्हेगारी ही बाब जेव्हापासून स्मार्टफोन अस्तित्वात आला. तेव्हापासून चालत आलेला प्रकार असून यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. चोर हे एवढे हुशार बनले आहेत की त्यांनी त्यांना असलेल्या बुद्धिमत्तेचा वापर ए आय च्या माध्यमातून लोकांचे पैसे कसे हडप करता येईल. लोकांच्या मनावर राज्य कसं करता येईल यासाठी करीत असतात. त्याच माध्यमातून ते आपल्याला केवळ पैशाच्या माध्यमातूनच लुटत नाही तर आपल्याला शारिरीक, मानसिक, भावनीक या साऱ्याच बाबींतून लुटत असतात. म्हणूनच यात जास्त उलझत न जाता ताबडतोब यातून बाहेर पडण्याचा मार्ग काढण्याची गरज आहे. जेणेकरुन आपली जास्त प्रमाणात फसगत होणार नाही व आपण सुरक्षितही राहू शकू. यात शंका नाही.

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्यावतीने मान्सून पूर्व रंगीत तालीम संपन्न

नांदेड/प्रतिनिधी- नांदेड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने जिल्हास्तरीय मान्सून-२०२६ पूर्व तयारी- पूर परिस्थीतीमध्ये करावयाचे शोध व बचाव कार्याबाबत रंगीत तालमि सराव सत्र काळेश्वर घाट विष्णुपुरी नांदेड येथे आज संपन्न झाले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधकिरणचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शन व प्रमुख उपस्थितीत सदर रंगीत तालीम सराव सत्र संपन्न झाले.

या रंगीत तालीममध्ये पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्य कसे करायचे, काय पुर्व तयारी करायची, आयआरबी बोट कशी असेंबल करायची तसेच पुर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्यास आवश्यक साहित्य परचिय तसेच ते साहित्य कशाप्रकारे हाताळायचे याबाबत प्रशक्षिण व प्रत्यक्ष हाताळण्याबाबत सराव देण्यात आले. सदर रंगीत तालिमेत प्रशक्षिण हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत असलेले अग्नीशमन दल, नांदेड पोलीस शिघ्र प्रतिसाद दल, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे वैद्यकीय पथक, तहसिल कार्यालय नांदेड यांच्याकडुन संयुक्त समन्वयातून देण्यात आले.

यावेळी नांदेड शहर महानगरपालिकेच्यावतीने अग्नीशमन अधिकारी केरोजी दासरे यांच्यासोबत उपअग्नीशमन अधकिारी निलेश कांबळे यांनी आयआरबी बोट कशी असेंबल करायची व पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्य कसे करायचे व त्याकरीता कोणती साहित्य वापरायची याबाबत सखोल मार्गदर्शन केले, पोलिस विभागाच्यावतीने उपअधिक्षक प्रशांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पिआय दर्शने यांच्यासह क्युआरटीचे ज्ञानोबा चोंडे यांनी पोलिस शिघ्र प्रतिसाद दलाकडून मागील वर्षी करण्यात आलेल्या शोध व बचाव कार्याबाबतची माहिती दिली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत डॉ. सुनील कुलकर्णी व सचिन कोताकोंडावार यांनी सिपिआर बाबत सखोल माहिती दिली व प्रत्यक्ष सराव प्रात्याक्षीक करुन घेतले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी मागील वर्षी शोध व बचाव कार्य चांगल्या पध्दतीने केल्याबद्दल सर्व संबंधीत यंत्रणांचे कौतुक केले. यावर्षी सर्वानी प्रशिक्षीत होऊन एकमेंकाच्या समन्वयातून आपण मान्सून २०२६ करीता चांगल्या पध्दतीने तयारी करु या सज्ज राहुया असे मनोगत व्यक्त केले. विठ्ठल परळीकर तहसलिदार लोहा, संजय वारकड तहसलिदार नांदेड यांनी मागील वर्षीचे पुर शोध व बचाव कार्याबाबतचे अनुभव मांडले तसेच यावर्षीच्या मान्सून करीता आपण सर्व तयारीनिशी सज्ज राहावे असे मनोगत व्यक्त केले. तर तालुका आरोग्य अधकिारी डॉ.जगदीश कांबळे व डॉ.प्रवीण मुंडे यांनी मान्सून मध्ये आरोग्याची कशी दक्षता घ्यावी, पाणी शुध्दीकरण व पूर परस्थिती नंतर घ्यावयाची काळजी बाबत तसेच गरोदर महिलाबाबत काय दक्षता घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले, सदर रंगीत तालिम प्रशिक्षणाचे



समन्वाची भुमिका किशोर कुऱ्हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी पार पाडली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नायब तहसिलदार सुनिल माचेवाड यांनी केले तर प्रास्तवीक गौरव तिवारी डीडीएमएस, आभार प्रदर्शन बारकुजी मोरे महसूल सहायक यांनी केले. यावेळी नांदेड जिल्हयातील सोळा तहसिल कार्यालय, पंचायत समिती, कृषी, आरोग्य, नगरपालिका, पोलिस विभागातील जवळपास अडीचशे ते तिनशे अधिकारी कर्मचारी यांनी या प्रशिक्षणात सक्रीय सहभाग घेतला. सदर रंगीत तालिम यशस्वी करण्याकरीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व तहसिल कार्यालय नांदेडच्या अधिकारी कर्मचारी यांनी परश्रिम घेतले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# तब्बल ५० वर्षांपासून बंद असलेला शेत रस्ता महसूल विभागाच्या पुढाकाराने मोकळा

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरालगत असलेल्या एका वडिलोपार्जित शेताकडे जाणारा तब्बल ५० वर्षांपासून बंद असलेला शेतरस्ता महसूल विभागाच्या विशेष प्रयत्नांतून अखेर मोकळा करण्यात आला आहे. या निर्णयामुळे केवळ एका शेतकऱ्यालाच नव्हे, तर परिसरातील शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण भागातील सामंजस्य, लोकसहभाग आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक पत्रकार शेख चांदपाशा यांच्या वडिलोपार्जित शेताकडे जाण्यासाठी अनेक दशकांपासून अधिकृत मार्ग उपलब्ध नव्हता. त्यामुळे शेतीची मशागत, पिकांची वाहतूक तसेच शेतीविषयक दैनंदिन कामकाज करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शेतरस्ता बंद असल्याने संबंधित शेतजमिनीचा पूर्ण क्षमतेने उपयोग करणेही कठीण झाले होते. दरम्यान, राज्य शासनाने मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत गाव नकाश्यानुसार अतिक्रमित अथवा बंद झालेल्या गाडी रस्ते, पांदण रस्ते, शेतशिवारातील मार्ग आणि पायी जाण्याचे सार्वजनिक मार्ग मोकळे करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने हदगाव तालुक्यातही महसूल विभागाकडून विविध प्रकरणांचा आढावा घेण्यात येत आहे. तहसीलदार तथा दंडाधिकारी सय्यद उमर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी प्रशांत हसनाबादे आणि मंडळ अधिकारी विजय महाजन यांनी संबंधित प्रकरण गांभीर्याने हाताळले. त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून शासनाच्या धोरणाची माहिती दिली तसेच शेतरस्त्यांचे सामाजिक आणि आर्थिक महत्त्व समजावून सांगितले. प्रशासनाच्या संयमी आणि समन्वयात्मक भूमिकेमुळे संबंधित शेतकऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. महसूल विभागाच्या या प्रयत्नांमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मार्गाचा प्रश्न मार्गी लागला आणि बंद असलेला शेतरस्ता पुन्हा खुला झाला. या घटनेमुळे ग्रामीण भागात वादविवाद किंवा न्यायालयीन संघर्ष टाळून संवाद आणि सामंजस्याच्या माध्यमातून प्रश्न सोडविता येतात, हा संदेशही समाजापुढे गेला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. शेतरस्ते उपलब्ध झाल्यास शेती उत्पादनात वाढ, वाहतूक खर्चात बचत आणि कृषी विकासाला चालना मिळण्यास मदत होते. त्यामुळे शासनाच्या या मोहिमेकडून शेतकरी वर्गात समाधान व्यक्त केले जात असून तालुक्यातील इतर बंद किंवा अतिक्रमित शेतरस्त्यांचे प्रश्नही याच पद्धतीने सोडविण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनी महसूल विभागाच्या या कार्याचे स्वागत केले असून प्रशासनाने लोकसहभागातून राबविलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# अन्न व औषध प्रशासनाने बारड येथील दुध संकलन केंद्रावर केली तपासणी

नांदेड/प्रतिनिधी- बारड येथील सात दुध संकलन केंद्राची अन्न व औषध विभागाच्या पथकाने तपासणी करुन काही दुध जन्य पदार्थाचे नमुने घेतले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा आयुक्त म. राज्य तुकाराम मुंडे यांचे आदेशाने व अन्न व औषध प्रशासन सह आयुक्त (अन्न), छत्रपती संभाजी नगर श्रीकांत करकाळे यांचे मार्गदर्शनाखाली ११ जून रोजी नांदेड कार्यालयाचे सहायक आयुक्त (अन्न) रा.मा. भरकड व अन्न सुरक्षा अधिकारी सर्वश्री संतोष कनकावाड, ऋषिकेश मरेवार, अनिकेत भिसे, अविनाश गिरी, श्रीमती शिल्पा श्रीरामे, श्रीमती अमृता दुधाटे, नमुना सहायक बालाजी सोनटक्के यांनी बारड या गावी पहाटे ५ ते ७ चे दरम्यान एकूण ७ विविध दुध संकलन केंद्राची तपासणी करून एकून १३ दुध व दुग्धजन्य पदार्थाचे नमुने घेवून ते तपासणीस्तव प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. तपासणीस्तव घेण्यात आलेले एकून १३ नमुने पैकी गायीचे दुधाचे -पाच नमुने, म्हशीचे दुधाचे - सहा नमुने, पनीर- एक नमुना व दही - एक नमुना आहेत. तसेच तपासणी दरम्यान एका पेढीकडे नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने त्या पेढीस नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यंत व्यवसाय बंद करणे बाबत आदेशित करण्यात आलेले आहेत अशी माहिती, सहायक आयुक्त रा.मा. भरकड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली

## दोन अल्पवयीन मुलांची सुटका

नांदेड/प्रतिनिधी-जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त शुक्रवार १२ जून रोजी कामगार विभागामार्फत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ कार्यालय परिसरातून करण्यात आला. सहाय्यक कामगार आयुक्त आशिष ढवळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जनजागृती रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी कामगार विभागाचे अधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे प्रतिनिधी, महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते तसेच इतर संबंधित विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅली पूर्वी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान विविध आस्थापना, हॉटेल्स, व्यावसायिक प्रतिष्ठाने व मॉल्स यांना भेटी देण्यात आल्या. बालकामगार न ठेवण्याबाबत संबंधित आस्थापनांकडून हमीपत्रे घेण्यात आली तसेच बालकामगार प्रतिबंधक संदेश असलेले स्टिकर्स लावून जनजागृती करण्यात आली. अभियानादरम्यान ढवळे कॉर्नर परिसरातील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलांकडून काम करून घेतले जात असल्याची बाब निदर्शनास आली. त्यानुसार कामगार विभागाने पोलिस विभागाच्या सहकार्याने संयुक्त कारवाई करून संबंधित अल्पवयीन मुलांची सुटका केली. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. बालकामगार सुधारणा अधिनियम २०१६ नुसार १४ वर्षांखालील बालकांना कोणत्याही व्यवसायात अथवा प्रक्रियेत कामावर ठेवणे दंडनीय गुन्हा आहे. तसेच १४ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांना धोकादायक व्यवसायांमध्ये रोजगार देण्यास मनाई आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नियोक्त्यांवर कारावास व दंडाची तरतूद करण्यात आली आहे.




युवा सेना जिल्हाप्रमुख विठ्ठल बाळू पाटील मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे आ.आनंदराव बोंढारकर व आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी शाल व पुष्पहार घालून त्यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी मोतीराम पाटील मोरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, स.दर्शनसिंघ सिद्धू, श्याम पाटील वानखेडे, अशोक मोरे, सुहास खरणे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# नांदेड जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची मजविपची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत मराठवाडा जनता विकास परिषदेच्या नांदेड जिल्हा शाखेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनात महसूल आयुक्तालयाची स्थापना, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ, नवीन बसस्थानकांची उभारणी, एमआयडीसीतील उद्योगांचे पुनरुज्जीवन यासह अनेक महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष डॉ. बालाजी कोंपलवार, उपाध्यक्ष भाऊराव मोरे, गोविंदराव सिंदीकर, सचिव संभाजी शिंदे, कोषाध्यक्षपदी प्रभाकर लखे, तसेच डॉ. पुष्पा कोकीळ, डॉ. अशोक बेलखोडे, गंगाधर नेमाणीवार, डॉ.व्यंकटेश काब्दे, इंजि. द.मा. रेड्डी, जी. पी. मिसाळे, नागोराव पाटील रोषणगावकर, डॉ. लक्ष्मण शिंदे आणि अॅड. धोंडीबाराव पवार, माधव पटणे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनामध्ये नांदेड येथे महसूल आयुक्तालय मंजूर करून सुरू करणे, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ देऊन निधीसह कार्यान्वित करणे, नांदेड-बारड मार्गावरील संपादित जागेवर आयुर्वेद महाविद्यालय उभारणे, शहरातील प्रमुख नाल्यांचे सिमेंट अस्तरीकरण करणे तसेच जिल्ह्यातील एमआयडीसीमधील बंद पडलेले उद्योग पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.वाढत्या शहराचा विचार करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी लातूर फाटा, कापूस संशोधन केंद्र व सांगवी (विमानतळ) परिसरात नवीन बसस्थानके उभारण्यात यावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. त्याचबरोबर रेल्वे स्थानकासमोरील सिटी बसस्थानकाचे नूतनीकरण आणि शहरातील दोन तृतीयांश उड्डाण पुलांना मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली आहे.याशिवाय स्वतंत्र निवेदनाद्वारे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला ३० एप्रिल २०२० पासून मुदतवाढ मिळालेली नसल्याने मराठवाड्याचा विकास रखडल्याचे नमूद करण्यात आले आहे. मराठवाड्याचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अनुशेष दूर करण्यासाठी मंडळाला तातडीने मुदतवाढ देऊन कार्यान्वित करावे, अशी मागणी परिषदेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.मराठवाडा जनता विकास परिषदेच्या या मागण्यांमुळे नांदेडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# झरी ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी




देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे झरी येथील ग्रामपंचायतीमध्ये विविध विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या निधीच्या वितरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, ग्राम पंचायतीमार्फत राज्य शासन, केंद्र शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झालेल्या विविध विकासनिधींचा वापर कागदोपत्री दाखविण्यात आला असला तरी प्रत्यक्षात अनेक कामे निकृष्ट दर्जाची, अपूर्ण किंवा अस्तित्वात नसल्याचा आरोप उपसरपंच सचिन पाटील यांनी केला आहे. ग्रामविकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच, कंत्राटदार व काही गाव पुढाऱ्यांच्या संगनमताने अपहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, अनेक खर्चांच्या नोंदी संबंधित ग्रामसभेच्या मंजुरी शिवाय करण्यात आल्या असून काही निवडक व्यक्ती व व्यापाऱ्यांच्या नावावर बिले काढून निधीची उचल करण्यात आली. संबंधित व्यापाऱ्यांकडे शासनमान्य परवाने होते का, प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा पुरविण्यात आल्या होत्या का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या वित्त आयोग निधी, ग्रामनिधी तसेच इतर सर्व योजनांमधून मंजूर झालेल्या प्रस्तावांची प्रत्यक्ष पडताळणी करून एप्रिल २०२५ ते जून २०२६ या कालावधीतील जमा-खर्चाचा तपशील तपासावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. याशिवाय, दाखविण्यात आलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून व्हाऊचर, बिले आणि कामांची गुणवत्ता यांची तुलना करण्याची मागणीही करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणात दोषी आढळणाऱ्या तत्कालीन ग्रामसेवक, कंत्राटदार तसेच निधी स्वीकारणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी घरी गावचे उपसरपंच सचिन पाटील यांनी केली आहे. झरी ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी अपेक्षा झरी गावचे उपसरपंच सचिन पाटील यांनी गटविकास अधिकारी देगलूर यांना निवेदना मार्फत कळविले.आठ दिवसात अधिकाऱ्यांनी संबंधितावर कारवाई केली नाही तर आमरण उपोषणाचा इशारा सचिन पाटील उपसरपंच यांनी प्रशासनाला दिला आहे

# ढगाळ वातावरणानंतर उकाडा वाढला

बिलोली/प्रतिनिधी-तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि अधूनमधून पावसाची शक्यता निर्माण होत असली तरी प्रत्यक्षात पाऊस न झाल्याने उकाड्यात मोठी वाढ झाली आहे. सकाळपासूनच कडक ऊन आणि दमट वातावरणामुळे नागरिकांना अस्वस्थता जाणवत आहे.उकाड्यामुळे थंड पेये, फळांचे रस, उसाचा रस आणि आईस्क्रीमला मागणी वाढली आहे. अनेक ठिकाणी नागरिक सावलीचा आधार घेताना दिसत आहेत. हवामान विभागाने पुढील काही दिवस वातावरणात बदल होण्याची शक्यता व्यक्त केली असली तरी सध्या वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

# 'गाण्यांची अंगतपंगत'समूहाचा वार्षिक समारंभ रविवारी

नांदेड/प्रतिनिधी-गुरुवर्य प्र.तु.शास्त्री गुरुजी यांच्या प्रेरणेने सुरु झालेला आणि संगीतप्रेमींच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारा गाण्यांची अंगतपंगत हा अनोखा उपक्रम आता पंधराव्या वर्षात पदार्पण करत आहे. जुनी गाणी ऐकणे, त्यावरील भावना व अनुभव व्यक्त करणे आणि संगीताच्या माध्यमातून मैत्रीचे बंध दृढ करणे, या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेमुळे हा उपक्रम अनेक वर्षापासून सातत्याने दरमहा आयोजित केला जात आहे.

या उपक्रमाचा वार्षिक समारंभ रविवार, १४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता हॉटेल विसावा पॅलेस येथे आयोजित करण्यात आला आहे. यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना सिनेसृष्टीचे नायक अशी असून, विविध चित्रपटांतील लोकप्रिय नायकांवर चित्रित झालेली गीते सादर करण्यात येणार आहेत. संगीतप्रेमी आणि रसिकांसाठी हा कार्यक्रम जुन्या हिंदी-मराठी चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळाची आठवण करुन देणारा ठरणार आहे. कार्यक्रमाला शहरातील संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# खंजर बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-खंजर जवळ बाळगणाऱ्या एका तरुणास नांदेड ग्रामीण पोलीसांनी गुरुवारी दुपारी बोंढार बायपास रोडवर अटक केली आहे. शेख शफी उर्फ अरबाज शेख रौफ (वय २५) रा.गाडेगाव, नांदेड हा तरुण गुरुवारी दुपारी खंजर घेवून बोंढार बायपास रोडवर संशयास्पदरित्या फिरत असतांना नांदेड ग्रामीण पोलीसांनी त्यास अटक केली. या प्रकरणी त्याच्या विरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड,
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७५५/२०२६
अजय व ईतर वि.निरंक
ने.ता.१८/०७/२०२६

अर्जदार : १.अजय पि.यशवंत साळवे, वय ३९ वर्षे, व्यवसाय मजुरी, २.नैतिक पि.अजय साळवे, वय ३ वर्षे,व्यवसाय निरंक, दोघे रा.आंबेडकरनगर,पोस्ट सिन्नर ता.सिन्नर जि.नाशिक

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत रुपाली भ्र.अजय साळवे यांचा मृत्यु दिनांक १३/०४/२०२६ रोजी सरकारी दवाखाना, विष्णुपुरी,नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा आहे. सदरच्या अर्जात अर्जदार यांनी अर्जदार हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक १८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक-१३/०५/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री.गायकवाड लक्ष्मण बाबा रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.गायकवाड कार्तीक लक्ष्मण रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव गायकवाड कार्तीक लक्ष्मण रा.हाळदा ता.कंधार या ठिकाणी दिनांक १२/१०/२०१८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करीता सदर तहसिल कार्यालय कंधार येथे दिनांक ११/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १३/०५/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

CHANGE IN NAME

My (old name) is **SYED ISHAQUE ATEEQUE** which now I am, changing as (new name) **SYED ISHAQ ATEEQ SYED MOINUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SYED ISHAQ ATEEQ SYED MOINUDDIN**
R/o Near Jawhar Club Degloor
Dist. Nanded-431717
M.No.-9689974737

CHANGE IN NAME

My (old name) is **SYED AYESHA ANJUM** which now I am, changing as (new name) **AYESHA ANJUM**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**AYESHA ANJUM**
R/o Shivray nagar, Malegaon road
Nanded-431601
M.No.-9307926744

CHANGE IN NAME

My (old name) is **SYED ABDUS SALAAM** which now I am, changing as (new name) **SYED ABDUS SALAM SYED ISAQ ATEEQ**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SYED ABDUS SALAM SYED ISAQ ATEEQ**
R/o Near Jawhar Club Degloor
Dist. Nanded-431717
M.No.-9307926744

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अटक



नांदेड/प्रतिनिधी-खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस भाग्यनगर पोलीसांनी मानवत रेल्वेस्थानक परिसरातून दि.१० जून रोजी अटक केली आहे.

भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दि.४ एप्रिल २०२६ रोजी खुनाची घटना घडली होती. या घटनेतील आरोपी सुरज सुनिल कदम (वय २२) रा.विनायकनगर,नांदेड हा फरार होता. गुप्त व तांत्रिक साह्याने पोलीसांना माहिती मिळाली की, सदरील आरोपी हा परभणी येथे आहे. पोलीस निरिक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार नरेश वाडेवाले व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवार दि.१० जून रोजी मानवत पोलीस स्टेशन परिसरातून सुरज कदम यास अटक केली आहे.

# मूळ जागा बदलून उभारले बंधारे?;२० लाखांच्या सिमेंट बंधाऱ्यात गैरव्यवहार

## संबंधित अभियंते व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची सरपंच अनिल डुडुळे यांची मागणी

किनवट/प्रतिनिधी-जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग किनवट कार्यालयातील भ्रष्ट यंत्रणेचे वाभाडे काढण्यासाठी दाभाडी येथील सरपंच अनिल डुडूळेंनी मोर्चा सांभाळला आहे. दाभाडी शिवारात एकाच कालव्यावर निकृष्ट दर्जाचे दोन सिमेंट बंधारे बांधण्यात आली असून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होण्यापुर्वी क्वालिटी कंट्रोल विभागामार्फत प्रतवारी काढून कंत्राटदारासह संबंधित अभियंत्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी लाऊन धरली आहे. वास्तव प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्यास सत्यता समोर आणण्यासाठी उपोषणाचा मार्ग अवलंबणार असल्याचा इशारा दिला आहे.



जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी उपयोजना सन २०२४-२५) अंतर्गत किनवट जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाच्या कार्यकक्षेतील दाभाडी गावच्या शेत शिवारातील एका छोट्याशा कालव्यावर दोन सिमेंट बंधारे उभारण्यासाठी २० लाख रुपयाचा निधी वळता केलाय. दरम्यान २८ जानेवारी २०२५ रोजी दाभाडी ग्रामपंचायतीने मासिक सभा घेऊन कामाचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर सादर करण्यासाठी ठराव पारित करून संबंधितांना कल्पना दिली. परंतु कंत्राटदार चेतन प्रभाकर केंद्रे यांनी मंजुरी मिळाल्यानंतर अंदाज पत्रकानुसार कामे मूळ ठिकाणी आणि प्रमाणबद्ध मटेरियल न वापरता बोगस काम करुन विकास निधीवर हात फिरवलाय. अत्यंत कमी खोदकाम करून बेसमेट तयार केले. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीने यंत्रणेच्या माध्यमातून सिमांकन केलेल्या ठिकाणी बंधारे उभारण्यात आलेली नाहीत. ज्या ठिकाणी बंधारे उभारण्यात आलीत त्या शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय उभारलीत. सदर कामाला दाभाडी ग्रामपंचायतीने ना हरकत दिलेली नाही. मुळात बंधाऱ्याच्या बांधकामादरम्यान उपअभियंता, शाखा अभियंत्यांनी प्रत्यक्ष कामाला भेटी देऊन अंदाज पत्रकातील नोंदीनुसार सामुग्रीचे मुल्यांकन करण्याची मागणी केल्या नंतरही त्यांनी दुर्लक्ष केले. मोजमाप पुस्तिकेतील नोंदी ह्या कार्यालयात बसून केल्याचा आरोप पेसा कायद्यांतर्गतच्या दाभाडी ग्रामपंचायतीचे सरपंच डुडूळे यांनी केला आहे. कालवावरील बंधारे लहान आणि पाण्याचा मारा जास्त होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे नुकसान हे अटळ आहे. त्यास जिम्मेदार यंत्रणा असेल असे २ जून रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रकात इशारा दिला आहे. त्याच्यावर कारवाई न झाल्यास किनवट कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचे सरपंच डुडूळे यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांनी ३० जूनपर्यंत ई-केवायसी करावी;जुलैमध्ये रक्कम जमा होण्याची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया ३० जून पर्यंत पूर्ण करावी. निर्धारित कालावधीत ई-केवायसी न करणाऱ्या लाभार्थ्यांना पुढील हप्त्याची रक्कम मिळण्यात अडचणी येऊ शकतात, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

केंद्र सरकारने २०१९ मध्ये सुरू केलेल्या पीएम-किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांची मदत तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. मार्च २०२६ पर्यंत या योजनेचे २२ हप्ते वितरित करण्यात आले असून, १३ मार्च रोजी २२ व्या हप्त्याची दोन हजार रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली होती.ई-केवायसीसाठी शेतकऱ्यांना दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. बायोमेट्रिक प्रमाणीकरणासाठी जवळच्या कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी)मध्ये जाऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. तसेच पीएम-किसान मोबाईल अॅपच्या माध्यमातून फेस ऑथेंटिकेशनद्वारे घरबसल्या ई-केवायसी करता येणार आहे.दरम्यान, वृद्ध, आजारी आणि दिव्यांग लाभार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, ग्रामस्तरीय नोडल अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत अशा लाभार्थ्यांची फेस ऑथेंटिकेशनद्वारे ई-केवायसी पूर्ण करून देण्यात येणार आहे.पीएम-किसान योजनेचे हप्ते साधारणपणे चार महिन्यांच्या अंतराने दिले जात असल्याने, मार्चमध्ये २२ वा हप्ता मिळाल्यानंतर आता शेतकऱ्यांचे लक्ष २३ व्या हप्त्याकडे लागले आहे. खरीप हंगाम आणि पेरणीच्या पार्श्वभूमीवर जुलै महिन्यात पुढील दोन हजार रुपयांचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे योजनेचा लाभ कायम ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी ३० जूनपूर्वी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




छाया-करणसिंह बैस

अ.भा.भोई समाज सेवा संस्थेच्या वतीने शहरातील शंकरराव चव्हाण सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी आ.बालाजीराव कल्याणकर, आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी अॅड.गजानन साटोटे, तुकाराम वानखेडे, पांडुरंग गलपवाड, नानासाहेब लखारे, डी.के.टोकलवाड, माजी जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील, सविता डहे, प्रियंका अडगुलवार यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# शेतीसाठी विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची युवक काँग्रेसची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-शेतीसाठी होणारा विद्युत पुरवठा सुरळीत ठेवावा व वीज कपातीचा निर्णय तात्काळ स्थगित करावा, या मागणीचे निवेदन नांदेड जिल्हा दक्षिण युवक काँग्रेसच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना देण्यात आले.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या जिल्ह्यातील फळबागा तसेच मसाला पिकांना पाण्याची नितांत आवश्यकता आहे. विशेषतः हळद लागवडीचे मोठे नुकसान होत असून अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत महावितरणने शेतीसाठी होणाऱ्या वीज पुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे.यावेळी राज्याचे ऊर्जामंत्री यांनी वीज कपातीचा निर्णय स्थगित करून शेतीसाठी नियमित व अखंडित वीज पुरवठा सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली.निवेदन देताना नांदेड जिल्हा दक्षिण युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल पेदेवाड, काँग्रेसचे कार्यालयीन सचिव प्रकाश दीपके, युवक काँग्रेसचे महासचिव शिवम पाटील, सचिव सचिन गुद्दे, देगलूर-बिलोली विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष उत्कर्ष सोंडारे, एनएसयूआय प्रदेश महासचिव किरण पडलवार, नांदेड शहर जिल्हाध्यक्ष (सोशल मीडिया) गंगाधर आडेराव, प्रथमेश गिरी, दक्षिण महासचिव लक्ष्मण राऊत आदी उपस्थित होते.

# खंडणीची मागणी करणाऱ्या चार जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-दुचाकीवर जाणाऱ्या दोन तरुणांना अडवून त्यांना मारहाण करीत खंडणीची मागणी करणाऱ्या चार जणांना शिवाजीनगर पोलीसांनी अटक केली आहे.

या घटनेची माहिती अशी की, शहरातील नवीन मोंढा भागात गुरुवार दि.११ जून रोजी रात्री ८ वाजता साईनाथ वसंत माने (वय १९) रा.पिंपळगाव ता.नायगाव हा व त्याचा मित्र दुचाकीवर जात असतांना पाठीमागून दोन दुचाकीवर आलेल्या चार तरुणांनी साईनाथ माने यांची दुचाकी अडविली. माने व त्यांच्या मित्रास मारहाण करुन त्यांच्या खिशातील एक हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. साईनाथ माने यास आरोपींनी दुचाकीवर जबरदस्तीने बसवून अन्य ठिकाणी घेवून गेले. त्याठिकाणी माने यांना मारहाण करीत फोन पे वरुन सातशे रुपये घेतले. २० हजार रुपये खंडणीची मागणी केली. साईनाथ माने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी तात्काळ कारवाई करुन संतोष चांदु वाघमारे (वय १९) रा.कामठा, सुमित देवानंद भन्डवाले रा.पुयणी, जयसेन संजय चौदंते रा.आंबेडकरनगर, यथ पाटील रा.नुरी चौक,नांदेड यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकीची जप्तीची कारवाई पोलीसांनी सुरु केली.

# महिलेची सोन्याची एकदानी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील करडखेड येथे वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ जबरीने हिसकावून नेणाऱ्या आरोपीला अटक करून मुद्देमाल हस्तगत करण्यात देगलूर पोलिसांना यश आले आहे.

दि.२४ एप्रिल रोजी करडखेड येथील जिजाबाई गंगाराम शंकरने वय ७५ वर्ष या त्यांच्या घरासमोरील हॉलमध्ये झोपल्या होत्या यावेळी अज्ञात आरोपीने त्यांच्याकडे टॉवेलने महिलेचे तोंड दाबले व लोखंडी दावणाने त्यांच्या मानेवर तसेच डाव्या डोळ्याखाली मारहाण करून त्यांना जखमी केले त्यानंतर महिलेच्या गळ्यातील अंदाजे दीड तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ योगदानी किंमत सुमारे एक लाख पन्नास हजार रुपये जबरीने तोडून घेऊन आरोपी घटनास्थळावरून प्रसार झाला घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सूर्यमोहन गोलमवाड यांनी तात्काळ आरोपीचा शोध घेण्याच्या आदेश दिले त्यानुसार करडखेड बीट जमादार साहेबराव सगरोळीकर व पोलीस कर्मचारी संतोष बोकलवार यांनी घटनास्थळी गाव घेतली त्यांनी घटनेचे सविस्तर माहिती घेऊन परिसरात आरोपीचा शोध सुरू केला तपासा दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीची ओळख पाठविण्यात पोलिसांना यश आले आहे तपासात आरोपीचे नाव मारुती निवृत्ती सोनकांबळे राहणार अमदापुर तालुका देगलूर असल्याचे निष्पन्न झाले दरम्यान आरोपी देऊळ शहरातील सराफा लाईन मधील एका दुकानात शौर्याचे सोनं विक्री करण्यासाठी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली या माहितीच्या आधारे सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर यांच्या मदतीने पोलिसांनी तात्काळ सापळा रुचून आरोपीला देगलूर शहरातून मुद्देमाला सह ताब्यात घेतले.

### लातूरच्या तरुण इंजिनीअरने लंडनमध्ये आयुष्य संपवलं

लातूर:उच्च शिक्षणाच्या जोरावर परदेशात चांगली नोकरी, महिन्याला लाखो रुपयांचा पगार, डोळ्यात सुखी आयुष्य जगण्याची स्वप्न. सुखी संसार सुरु असताना आणि सगळेच सुरळीत असताना एका तरुणाने लंडनमध्ये टोकाचं पाऊल उचलत आपलं आयुष्य संपवल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. घटनेतील मृत हणमंत अण्णाराव पाटील हे मूळचे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील बोडका येथील रहिवासी होते. उच्च शिक्षण घेतल्यानंतर ते लंडन येथे आयटी इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. प्राथमिक माहितीनुसार, त्यांचा विवाह आठ वर्षांपूर्वी झाला होता. मात्र, त्यांना अपत्य नव्हते. अशातच गेल्या वर्षभरापासून पती-पत्नीमध्ये सतत भांडणं होत होती. तर कधी वैयक्तिक मतभेद आणि शाब्दिक चकमक होत होती. यामुळे त्यांची पत्नी त्यांच्यापासून विभक्त होऊन वेगळी राहत होती.दरम्यान, काही दिवसांपूर्वीच त्यांच्या पत्नीने हणमंत पाटील आणि त्यांच्या कुटुंबावर तब्बल २ कोटी रुपयांचा दावा दाखल केला होता.

# पत्नीच्या आत्महत्या प्रकरणी पतीला चार वर्षाची शिक्षा

नांदेड/प्रतिनिधी-पत्नीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्या प्रकरणी पतीस जिल्हा न्यायाधीश एम.एम.पाटील यांनी चार वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

वडेपुरी ता.लोहा येथील ज्ञानेश्वर विठ्ठल पांचाळ हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवून तीला त्रास देत मारहाण करीत असत. नेहमीच होणाऱ्या जाचक त्रासाला कंटाळून पांचाळ यांच्या पत्नीने दि.१२ डिसेंबर २०११ रोजी जाळून घेवून आत्महत्या केली होती. याप्रकरणी ज्ञानेश्वर पांचाळ याच्या विरुध्द सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोनखेड पोलीस स्टेशनचे तत्कालिन सपोनी साहेबराव नरवाडे यांनी आरोपी विरुध्द पुरावे गोळा करुन जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. न्यायमूर्ती एम.एम. पाटील यांनी सरकार पक्षाच्यावतीने दाखल केलेले पुरावे ग्राह्य धरुन आरोपी ज्ञानेश्वर विठ्ठल पांचाळ यास कलम ३०६ भादंवी अंतर्गत चार वर्ष सक्त मजुरीची शिक्षा सुनावणी आहे. सरकार पक्षाच्यावतीने अॅड.महेश कागणे यांनी बाजू मांडली. कोर्ट पैरी अधिकारी म्हणून एम.ए. शंकरे यांनी कामकाज पाहिले आहे.

पान १ वरुन

### हवाई दलाचे विमान...

मेचुकाकडे निघालेले एएन-३२ विमान बेपत्ता झाले होते. त्यानंतर झालेल्या व्यापक शोध मोहिमेत अरुणाचल प्रदेशातील डोंगराळ भागात विमानाचे अवशेष सापडले होते. त्या दुर्घटनेत विमानातील सर्व १३ जणांचा मृत्यू झाला होता. तसेच, जुलै २०१६ मध्ये चेन्नईहून पोर्ट ब्लेअरकडे जाणारे एएन-३२ विमान बंगालच्या उपसागरावर बेपत्ता झाले होते. त्या विमानातील २९ जणांना मृत घोषित करण्यात आले होते. त्यामुळे जोरहाटमधील ताज्या दुर्घटनेनंतर एएन-३२ विमानांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी...

आहे.दरम्यान, शेतकऱ्यांनी केवळ पूर्वमोसमी पावसावर अवलंबून न राहता पुरेशा पावसाची खात्री झाल्यानंतरच पेरणी करावी, तसेच कृषी विभाग व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून पीक नियोजन करावे, असे आवाहन हवामान तज्ज्ञांनी केले आहे.

### सरसकट कर्जमाफीसाठी...


ठेवावे, तसेच पोलिसांनी त्यांना कडक सुरक्षा देऊन अन्नाचा एक घासही खाऊ देऊ नये, अशी उपरोधिक टिप्पणी त्यांनी केली. एक-दोन महिने आंदोलनावर बसल्यानंतरच त्याची खरी परीक्षा होईल, असेही ते म्हणाले.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान पवार कुटुंबानेच केले असून, शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी आधी स्वतःच्या साखर कारखान्यांबाबत उत्तर द्यावे, असा आरोपही पडळकर यांनी केला.दरम्यान, आ.सदाभाऊ खोत यांनी रोहित पवार यांचे अन्नत्याग आंदोलन हे पापमोक्षासाठी असल्याची बोचरी टीका केली. राज्यातील खाजगी साखर कारखाने सहकारी करण्याची मागणी करावी, शेतकऱ्यांना एफआरपी देण्याची मागणी करावी, तसेच जिल्हा बँका, सूतगिरण्या आणि दूध संघ कोणी संपविले, याचे उत्तरही द्यावे, असा टोला त्यांनी लगावला.ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनीही रोहित पवार यांच्यावर टीका करत, पवार कुटुंबातील व्यक्तीने शेतकऱ्यांच्या आंदोलनाला बसणे म्हणजे मर्सिडीज कारला नांगर जुंपण्यासारखे असल्याचे म्हटले. पवार कुटुंबामुळेच राज्यातील शेती, सहकार आणि शैक्षणिक संस्था उद्ध्वस्त झाल्याचा आरोप करत त्यांनी रोहित पवार यांच्या आंदोलनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### गुत्तेदाराची मुजोरी;मनपा...

भाषेत उत्तरे देऊन सबगुत्तेदार जबाबदारी झटकत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी काही भागांची पाहणी करून पाईपलाईन योग्य पातळीवर टाकण्याच्या सूचना दिल्याची माहिती आहे. मात्र या सूचनांची अंमलबजावणी झाली नसतानाही संबंधित कामे पूर्ण झाल्याचे दाखवून खड्डे बुजवण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही नागरिकांना निकृष्ट दर्जाचे काम, तुटलेल्या सुविधा आणि अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अमृत- योजनेच्या कामांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून दोषी ठेकेदारांवर तसेच दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

# चंद्रकलाबाई पिराजी झोकदार यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव (खै) तालुक्यातील कुंचेली येथील चंद्रकलाबाई पिराजी झोकदार यांचे आज शनिवार दि.१३ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे (वय ८९) वर्ष होते.



त्यांच्या पश्चात १ मुलगा, ४ मुली, नातू, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या रविवार दि.१४.जून रोजी दुपारी १ वाजता नायगाव (खै) तालुक्यातील कुंचेली येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. चंद्रकलाबाई पिराजी झोकदार ह्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते कॉ. मोहनराव झोकदार यांच्या मातोश्री होत.

# प्रा.आनंद कर्णे यांना पीएचडी पदवी प्रदान

नांदेड/प्रतिनिधी-मास्टर दीनानाथ मंगेशकर कनिष्ठ महाविद्यालय सोमठाणा,ता. नायगाव येथील प्रा. आनंद कर्णे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सामाजिक शास्त्रे विद्या संकुल शाखेतील अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.



प्रा.आनंद कर्णे यांनी जनजीवणाचे अर्थशास्त्र आणि महात्मा बसवेश्वर यांचे अर्थमितीय विचार.. एक तौलनिक अर्थशास्त्रीय अभ्यास या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. डॉ. पराग खडके, बहिस्तक परिक्षक डॉ. भारती, संशोधन मार्गदर्शक डॉ.स्वामी एस. डी. तसेच प्रा. प्रभाकर उदगिरे, सूर्यकांत विश्वासराव, अॅड. अविनाश भोसीकर, डॉ. भोपळे, डॉ. खुशाल कारामुंगे, डॉ विशाल बेलुरे, डॉ.हनुमंत कंधारकर, प्रा. शीतल महाजन, डॉ. वैजयंती कस्तुरे, प्रा. नितीन गायकवाड, रत्नाकर कुऱ्हाडे, प्रा.रविकांत काळे, विश्वनाथ दासे, पिंटू बोंबले, वीरभद्र विभूते, शिवाजी भालेराव, कृष्णा भोसीकर, संतोष घोडके पत्रकार बालाजी नागसाखरे व मित्र परिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४